
REVIEW OF RESEARCH

# मराठेकालीन किल्ले

प्रा.डॉ.फुलचंद सुर्यभान दुधमाते

जवाहर महाविद्यालय,अणदूर
ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



**प्रस्तावना :—**

मराठयांच्या इतिहासात किल्याला अनन्य साधारण आहे. 17 व्या शतकामध्ये शिवाजी महाराजानी किल्ले जिं स्वराज्याची स्थापना केली. किल्ल्यांच्या साहय्याने राज्यि केला. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठी राज्य टिकवण्य किल्ल्यांनी साथ दिली. औरंगजेबाने प्रचंड शक्तिनिशी मराठी नष्ट करण्यासाठी खुप प्रयत्न केले. परंतू शिवरायाने f केलेल्या किल्ल्याच्या साहय्याने मराठयानी औरंगजेबाचे परतावून लावले.

किल्ले बांधण्याची कला प्राचीन काळापासून भारतामध्ये अस्तित्वात होती. भारतावर वर्चस्व प्रस्थापित करणा—या मुस्लीम राज्यकर्त्यांनाही किल्ल्यांचे महत्व माहित होते. मराठयानी आपले राज्य स्थापण्यासाठी किल्ल्यांचा पुरेपूर वापर करून घेतला. किल्ल्यांच्या आधारावरच शिवाजीच्या स्वराज्याचे रक्षण झाले. औरंगजेबासारख्या धुर्त शत्रूशी शिवाजी महाराजाना तोंड देता आले तेही किल्ल्यांमुळे शक्य झाले. सरंक्षणाच्या दृष्टीने किल्ल्यांना असाधारण महत्व असल्यामुळे किल्ल्यांच्या डागडूजीवर भरपूर खर्च केला जात असे.

**उदिष्टये :—**

मराठेकालीन किल्याचे अभ्यास करणे

प्राचीन काळापासून भारतीय लोकांना किल्ले बांधण्याची कला अवगत होती. याची साक्ष उत्खननात सापडलेल्या अवशेषावरून सांगता येते. वैदिक वाङःमयामध्येही किल्ल्यांचे उल्लेख आढळतात. इ.स.सनापूर्वी पाचव्या शतकात भारतीयांना दुर्ग बांधणीचे ज्ञान होते. अलेक्झांडर भारतात आला त्यावेळेस अनेक दुर्ग पंजाब परिसरामध्ये असल्याचे उल्लेख ग्रीक इतिहासकाराच्या लेखामध्ये आढळतो.

दक्षिण भारतामध्येही दुर्ग बांधण्याचे शास्त्र प्रगत झाले होते. याचे पुरावे प्राचीन तामीळ वाङःमयातून पहावयास मिळातात.. चालुक्यानी विजापूर जिल्हयात बदामी या ठिकाणी डोंगरावर किल्ला बांधुन राजधानी स्थापन केली होती. चालुक्यानंतर शिलाहार आणि यादव या राज्यकर्त्यांनी अकराव्या—बाराव्या शतकात गिरीदूर्गाला प्राधान्य दिल्याचे दिसून येते. किल्ल्याच्या वास्तूशास्त्रामध्ये इस्लामी अक्रमक जास्त पारंगत होते.

**इस्लामी राजवटीतील गडको**

भारतात इस्लाम सत्ता झाल्यानंतर इराणमध्ये प्रगत झ दुर्ग बांधणीच्या शास्त्रानुसार त व किल्ले बांधण्यास सुरूवात दुहेर तट, अर्धवर्तूळाकार बुरूज, संरक्षके एका मागोमाग एक अ परंतू एकमेकांना काटकोनात छे प्रवेशद्वारे, मारा करण्याच्य लपण्याच्या खास जागा, ग आणि जंग्या ही बहामनी किल्ल्याची खास वैशिष्टये येतील. भारतात किल्ल्यांचे त प्रगत होत असताना युरोपात मोठया प्रमाणावर बंदुकीच्या वापर मोठया प्रमाणावर होत गेत तोफखान्याच्या साहय्याने खिंडार पाडणे शक्य होऊ तटबंदीला किल्यावरून बंदुक तोफानी मारा करता यावा विशीष्ट प्रकारच्या जागा आणि पाकळया असलेल्या बुरूज तरतूद किल्ल्यांना करण्यात लागली. गोवळकोंडा व नळदूर्ग



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

येथील अनेक पाकळयाचे बुरूज वैशिष्टयेपूर्ण आहेत.

9)
10)
11)

**घाटमाथ्यावरील किल्ले :–**

महाराष्ट्राच्या इतिहासात सातवाहन काळापासून घाटमाथ्याला विशेष महत्त्व असल्याचे दूिसन येते. कार्ले, भाजे, कोंडाणे इ. प्रसिध्द लेण्या घाटमाथ्याच्या पोटातच कोरलेल्या आहेत. सातवाहन राजाचे प्राचीन शिलालेख असलेला प्रसिध्द नाणेघाट हा घाट मथ्याचाच एक भाग आहे. लेणी कोरण्याचे शास्त्र इ. पूर्व दुस–या शतकापासून इसवी सनाच्या नवव्या शतकापर्यंत महाराष्ट्रात चांगलेच प्रगत झाले होते. कोरीव व ताशीव कामाच्या प्रगतीमुळे गुळगुळी कडे उभारणे, भुयारी मार्ग खोदणे, पाण्याच्यां टाक्या तयार करणे इ. सोयी गिरीदुर्ग उभारणा–या राजकर्त्यांना करता आल्या.

सिंहगड,ईसागड, पुरंदर, पन्हाळा, रायगड, लोहगड, तुंग, तिकोना, विशालगड, शिवनेरी , प्रतापगड, हातगड, गुणवंतगड, साल्हेरा, गुल्हेर इत्यादी किल्ले घाटमाथ्यावरील महत्वाचे किल्ले म्हणून ओळखले जातात.

**मावळातील किल्ले : –**

मध्ययुगामध्ये मावळप्रदेशाला विशेष महत्व होते. मावळ प्रदेशातील प्रत्येक किल्ल्यांनी महत्वाची भूमिका पार पाडली आहे. किल्ल्याचे भौगोलिक महत्त्व ही तितकेच असल्याचे दिसून येते. शिवनेरी किल्याला बहामनी काळात ही महत्वाचा किल्ला मानला जात होता. जुन्नर हे शहर ही शिवनेरीच्या संरक्षणाखाली होता. चाकणचा भुईकोट किल्ला घोटण आणि पौड या मावळयांना संरक्षण देण्यास समर्थ होता. लोहगड या गिरीदूर्गावरून नाणे आणि आंदर मावळावर नजर ठेवणे सोयीचे होते. सिंहगडावरून मुसे तर रोहिडयावरून हिरडस मावळ, तसेच रोहिडे खोरे या भागावर नियंत्रण राखता येत असे. तोरणा आणि राजगड या किल्ल्यावरून गुंजणमावळ आणि कानद व वेळवंड ही दोन खोरी यावर वर्चस्व राखणे शक्य होत असे.

**देशावरील किल्ले :–**

यादव काळामध्ये राजधानीचे वैभव उपभोगलेले चांदवड व देवगिरी हे दोन गिरीदुर्गही याच रांगेत आहेत. सातमाळा अजिंठे या रांगेत असलेल्या गिरीदुर्गाचे स्थान अनेक दुष्टीने वैशिष्टयेपूर्ण मानावे लागेल. उत्तरेतून दक्षिणेत शिरणारे रस्ते या रांगेला वळसा घालून जात असल्यामुळे टेहळणीच्या आणि संरक्षणाच्या दृष्टीने अजिंठे रांगेतील विशेषतः नाशिक जिल्हयातील गिरीदुर्गाना मध्ययुगात महत्व प्राप्त झालेले होते.

डोगरांच्या रांगा सोडल्यास, नद्याच्या खो–यातून राजकीय आणि लष्करी हालचालीच्या दृष्टीकोणातून महत्वाच्या ठिकाणी दक्षिणेतील मुगलमानी राज्यकर्त्यांनी भुईकोट किल्ले बांधलेले दिसून येतात. अहमदनगर, नळदुर्ग, परांडा, सोलापूर येथील किल्ल्यांचा उल्लेख करता येईल. मोगलानी ज्यावेळी मराठयांचे गिरीदुर्ग जिंकण्यासाठी वेढे घातले त्यावेळी वरील किल्ल्यांनी रसद, शस्त्रास्त्रे, दारूगोळा पोहचविण्याचे कार्य केले.

शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची निर्मित करीत असताना त्यांनी किल्ल्यांना अतिशय महत्व दिल्याचे दिसून येते. किल्ल्यांमुळेच मराठयाच्या राज्याचे रक्षण होऊ शकले आणि त्यामुळेचे शत्रूचे कांहीही चालू शकले नाही. शिवाजी महाराजाच्या राज्यात एकूण 240 किल्ले होते. त्यापैकी 111 किल्ले खुद शिवाजी महाराजांनी बांधले होते.

**संदर्भ :–**

1) शिवकालीन पत्रसार संग्रह – आपटे द.वि.,केळकर न.चि. (संपा.)
2) शिवचरित्र प्रदीप – भा.इ.सं.मं.पुरस्कृत ग्रंथमाला – पुणे
3) श्री शिव भारत – भा.इ.सं.मंडळ,ग्रंथमाला , पुणे
4) मोगल मराठा संघर्ष – पगडी सेतू माधव (सपा.)
5) हिंदवी स्वराज्य आणि मोगल – पगडी सेतू माधव (संपा.)
6) साधन चिकीत्सा –बा.सी.बेंद्रे
7) शिवाजीची राजनिती– भा.वा.भट
8) शिवाजी आणि शिवयुग– सदाशिव आठवले

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad